<u>मजकुर :—</u>

दिनांक—२६/०९/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने “ **Best Detection of the Month** ” माहे जुलै —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ जुलै—२०२४

| | | |
|---|---|---|
| ०३ | सायबर पोलीस ठाणे, पूर्व विभाग , गुन्हे शाखा, मुंबई. | ०३/२०२४ कलम ४२०, ४६५, ४६७,४६८, ४७१, १२०(ब)ए २०१, ३४ भा.द.वि. सह कलम ६६(सी), ६६(डी) माहिती तंज्ञत्रान अधिनियम |

—: **“ फसव्या जाहिरातीत गुंतवणुक करण्यास सांगून आर्थिक फसवणुक करणे ”** :—

<u>गुन्हयाची थोडक्यात हकिकत</u> :— नमुद गुन्हयात SEQUOIA CAPITAL INDIA VENTURE CAPITAL AND GROWTH INVESTING FIRM या बनावट कंपनीचे प्रतिनिधी महिला नामे इशिता हसन टेलिग्राम आय. डी **@SHITA8888, D53 INDIA SEQUOIA CAPITAL BUSINEES SCHOOL** या व्हॉट्सअॅप ग्रुपचे ॲडमिन महिला नामे इशिता हसन (मो.क्र. **9472251094, 9366827873** ), चिन्मय गुलेचा, ( मो. क्र. **8794425157**) सिक्वीया ( मो. क्र. 9366044064 ) सिक्वीया कॅपीटल ( मो. क्र. **8828408149** ) तसेच STOCK FRONTLINE या बनावट कंपनीचे प्रतिनिधी व STOCK FRONTLINE - 2 या व्हॉट्सअॅप ग्रुपचे ॲडमिन अनिल जा शर्मा (मो.क्र.7302949859 / 9895227305 ) आशिष शाह ( मो. क्र. **9366597564** / **9366998688** ) यांनी आपापसात संगनमत व कट कारस्थान करून त्यांचे कंपनी मार्फत **https://www.sequoiacapital.top/SEQUOIA-V1.0.2.** या लिंकव्दारे SEQUOIA CAPITAL व **https://chcses-dll.com/** या लिंकव्दारे CHC-SES असे अॅप तसेच शेअर ट्रेडिंग गुंतवणुक फायदयाच्या टिप्स करीता **https://liv2933.cc/#room/1** हि लिंक तसेच वैयक्तिक माहिती भरण्याकरीता **https://forms.gle/uj8qzZX6cEryrjAMA** हि लिंक पाठवून शेअर ट्रेडींगमध्ये पैसे गुंतविल्यास जास्तीचा नफा होईल असे भासुवन ‘फि’ यांचा विश्वास संपादन करून त्यांना शेअर ट्रेडिंग, आय.पी.ओ व ब्लॉक डिल्स यामध्ये ट्रेडिंग करण्यास सांगुन विविध बॅक खात्यामध्ये रूपये 2,73,30,000/- इतकी रक्कम भरण्यास भाग पाडून सदरची रक्कम परत न देता त्यांचा अन्यायाने विश्वासघात करून ऑनलाईन आर्थिक फसवणुक केली म्हणुन

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | डॉ. अनुप प्रेमचंद्र नेहेते, वय ५२ वर्षे, |
| केलेली फसवणूक | :— | शेअर मार्केटमध्ये आर्थिक फायदयाचे आमीष दाखवुन तसेच आरोपींनीच बनविलेल्या ॲपमध्ये त्यांची भरलेली रक्कम ही चौपट होते हे दाखवुन त्यांना आणखी पैसे भरण्यास भाग पाडुन त्याची फसवणुक करणे. |
| अटक आरोपी | | १) बिशू सनातन दास २) तपश हरेकृष्ण देबनाथ ३)जॉय हरेंद्र बिस्वास, ४)अशित चंदन आचर्जी ५)प्रितोष सचिंद्र दास,६)मोहम्मद सुहेल ैध्व मोहम्मद सलिम<br>अटक दिनाक :— ०६/०७/२०२४ |
| हस्तगत मालमत्ता | :— | फिर्यादी यांचे फसवणुक झालेल्या रक्कमेपैकी रु. ७१,२१,२४३/—एवढी रक्कम आरोपींच्या विविध खात्या मध्ये गोठविण्यात आलेली आहे १) विविध कंपनींचे सिमकार्ड २) दोन पॅनकार्ड ३) ०५ व्हिजिटींग कार्ड ४)विविध कंपनीचे फोन ५) वेगवेगळया बॅकांचे ए.टी.एम. कार्ड, डेबिट कार्ड.६) स्टॅम्प७) संबंधित कागदपत्र |

**तपास कौशल्य :—** सदर गुन्हयाचे स्वरुप, व्याप्ती आणि गुन्हयात फसवणुक झालेली रक्कम पाहता सदर गुन्हा दाखल होण्याच्या अगोदरच तात्कालीन प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीमती एस. एस. सहस्त्रबुध्दे यांनी यातील फिर्यादी यांना सायबर गुन्हे हेल्पलाईन १९३० यावर संपर्क साधुन त्यावर त्यांची माहीती भरण्यास सांगीतली होती. प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीमती एस.एस. सहस्त्रबुध्दे यांनी उचललेल्या पावलामुळे फिर्यादी यांची ७१,२१,२४३ /— रु. एवढी मोठी रक्कम विविध बॅक अकाउंटमध्ये फ्रिज झालेली आहे. सदरची रक्कम ही योग्य कायदेशीर प्रक्रीयेदृवारे यातील फिर्यादी नामे डॉ. अनुप प्रेमचंद्र नेहेते, वय ५२ वर्ष, रा.ठि. ६०४, शिल्पी को.ऑ.हौ.सोसायटी, इंद्रप्रस्थ पार्क, ९० फुट रोड, मुलूंड पूर्व, मुबंई ४०००८१ यांना परत केलेली आहे.

सदर गुन्हा दाखल होताच गुन्हयाचे स्वरुप, व्याप्ती आणि गुन्हयात फसवणुक झालेली रक्कम पाहता त्याचा तपास हा तत्कालीन प्रभारी पोलीस निरीक्षक श्रीमती एस.एस. सहस्त्रबुध्दे यांनी स्वत:कडे घेवुन त्याचा तपास सुरु केला होता. सदर गुन्हयामध्ये पोलीस हवालदार उमेश ल. गरकल बक्कल नंबर ३३८११ यांनी तपासिक अंमलदार पोलीस निरीक्षक श्रीमती एस.एस. सहस्त्रबुध्दे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे सदर गुन्हयामध्ये वापरलेले सर्व मोबाईल नंबर हे लगेच सीडीआर आणि आयपीडीआर सीडीआरसाठी पाठवुन दिले. त्यानंतर त्यांनी अथक प्रयत्न करुन सदर गुन्हयामध्ये ज्या ज्या बॅकेच्या खात्यामध्ये यातील फसवणुक झालेली रक्कम गेलेली आहे, त्या संबधित बॅकेशी पत्रव्यवहार करुन सदर बॅकेच्या खातेदारांची माहीती मागविली होती. त्यातील त्यांच्या केवायसी कागदपत्रांचे अवलोकन करुन त्यातील खातेदारांचे मोबाईल नंबरची माहीती काढली होती. त्यानंतर सदरचे नंबर हे सीडीआर आणि आयपीडीआर सीडीआरची माहीती मागविली होती.

सदर गुन्हयाचे स्वरुप, व्याप्ती आणि गुन्हयात फसवणुक झालेली रक्कम पाहता आणि सदर गुन्हयामध्ये प्राप्त झालेली माहीती पाहता सदर गुन्हयाचा पुढील तपास हा नव्याने हजर झालेले पोलीस निरीक्षक रुपेश नाईक यांच्याकडे सोपविण्यात आला. त्यानंतर पोलीस निरीक्षक रुपेश नाईक यांनी तपास हाती घेतल्यानंतर सदर गुन्हयामध्ये प्राप्त झालेल्या अवाढव्य माहीतीचे विश्लेषण केले. जवळपास एक महीना पोलीस निरीक्षक रुपेश नाईक आणि पोलीस हवालदार उमेश ल. गरकल बक्कल नंबर ३३८११ यांनी अहोरात्र मेहनत सदर मिळालेल्या माहीतीचे तांत्रिक विश्लेषण करुन त्यामधुन आरोपीच्या एकमेकांच्या संबधाचा शोध घेवुन सदर गुन्हयामध्ये पुर्ण एक टोळी असल्याचे निष्पण करुन त्यांचे चालु मोबाईल क्रमांकाचा शोध लावलेला आहे. झालेल्या तपासाप्रमाणे पोलीस निरीक्षक रुपेश नाईक आणि टिमने दि. ०४.०६.२०२४ रोजी बिशू सनातन दास, वय १९ वर्षे, पत्ता — उत्तर रामनगर, गांधीग्राम (प),वेस्ट त्रिपुरा—७९९०१५ यास त्याचे राहते घरातुन ताब्यात घेवुन, एअरपोर्ट पोलीस ठाणे, नरसिंगढ, वेस्ट त्रिपुरा येथे अटक केली होती, दि. ०५.०६.२०२४ रोजी त्यास स्थानिक न्यायालयात हजर करुन त्याचा ट्रान्सिट रिमांड घेतला होता, परंतु स्थानिक वातावरण आणि मुंबईवरुन कुठलीही थेट विमानसेवा नसल्यामुळे वरी ठांनी तात्काळ अधिक मदत देण्यास नकार दिला असल्यामुळे वरील आरोपीता पोलीस निरीक्षक रुपेश नाईक यांनी पोलीस उपनिरीक्षक दत्ता अलगुर, पो.शि. विजय कांबळे ब.नं. ११३०५२, पो. शिपाई राहुल भडांगे ब.नं. १८०७५८ अशी टिम बनवुन वरील आरोपीतास पुढील कार्यवाहीसाठी मुंबई येथे पाठवुन दिले होते. त्यानंतर स्वत: आणि पो. हवा. उमेश गरकल ब.नं. ३३८११, पो.हवा.माधव उतेकर ब.नं. ०३.११२७ असे तेथेच राहुन पुढील तपास करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर या तिघांनीच पावसाळी आणि वादळी

वातावरण, स्थानिक भाषा याची पर्वा न करता आणखी चारजणांना ताब्यात घेवुन त्यांना अटक केली. त्यांची नावे पुढीलप्रमाणे

१) तपश हरेकृष्ण देबनाथ, वय २० वर्ष, धंदा – शिक्षण , राहणार – १५६८, वॉर्ड नंबर ६, आनंगानगर, नरसिंगढ,वेस्ट त्रिपुरा, त्रिपुरा ७९९०१५

२) जॉय हरेंद्र बिस्वास, वय २० वर्ष, धंदा – शिक्षण, राहणार–वॉर्ड नंबर ६, आनंगानगर, नरसिंगढ,वेस्ट त्रिपुरा, त्रिपुरा ७९९०१५

३) अशित चंदन आचर्जी , वय २२ वर्ष, धंदा– शिक्षण, राहणार – ७/१२४, ७ साऊथ माजलीसपुर, वेस्ट त्रिपुरा, त्रिपुरा ७९९०३५

४) प्रितोष सचिंद्र दास, वय – २७ वर्ष, धंदा–नोकरी (जीओ पीओएस एजंट), रा.ठि. नंदिटीला, पोस्ट– एस.डी.मिशन, पोलीस ठाणे – ए.डी.नगर पोलीस ठाणे, अगरताळा वेस्ट त्रिपुरा

दि.१०.०७.२०२४ मनुष्यबळाची कमतरता असल्यामुळे पश्चिम सायबर पोलीस ठाणे स.पो.नि. अमित उतेकर यांच्या नेवृत्वाखाली श्रेणी पो. उपनिरीक्षक देवराम पारधी, पो.ह.क्र. ३३८११/ उमेश गरकल, पो.शि. १८०७५८/राहुल भडांगे अशी एक टिम दिल्ली येथे पाठविण्यात आली. याअगोदर झालेला तांत्रिक तपास आणि आरोपीतांनी दिलेला जबाब यावरुन मोहम्मद सुहेल s/o मोहम्मद सलिम राठी ८८ए,३ रा माळा,याम लाल रोड, हिंदी पार्क जवळ, दर्यागंज, दिल्ली यास ताब्यात घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे.

**सयबर पोलीस ठाणे, पुर्व विभाग, गुन्हे शाखा, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा–याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | श्रीमती शार्मिला श्रीकांत सहस्त्रबुध्दे | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक, | श्री. रूपेश दिगंबर नाईक | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.ह.क्र.३३८११ | उमेश लक्ष्मण गरकल | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.शि.क्र.१८०७५८ | राहुल गौतम भडांगे | प्रशस्तीपत्रक |

मजकुर :—

दिनांक २६/०९/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे जलै —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) १) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ जुलै— २०२४

| | | |
|---|---|---|
| ०१ | नागपाडा पोलीस ठाणे, परिमंडळ—०३, मुंबई | गु.र.क्र. २४९/१८ कलम ३०२,३०७, २०१, ११४, ३४ भादवि सह ४,२७ भारतीय हत्यार कायदा |

—: '' अचानक उदभवविलेल्या भाडणातुन चाकुने वार करून खुन '':—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात नमुद आरोपीताने फिर्यादी व त्यांचा मित्र मोराशीद मो. सईद अन्सारी यांचेशी अचानक उदभवविलेल्या भाडणातुन चाकुने वार करून फिर्यादीचा मित्र नामे मो राशीद सईद अन्सारी यास जिवे ठार मारले व फिर्यादीना गंभीर जखमी केले म्हणुन गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री मोहम्मद रिजवान मुजाहीद कुरेशी, |
| बळीत | :— | मोहम्मद राशिद मोहम्मद सईद अन्सारी |
| निकाल दिनांक | :— | दिनांक ३०/०७/२०२४ |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) फाजील अहमद अब्दुल करीम अन्सारी वय २५ वर्षे<br>२) अब्दुल कय्युम अब्दुल रहीम अन्सारी वय ६२ वर्षे(मयत)<br>अटक दि—१२/०५/२०१८ |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | दिनांक ३०/०७/२४ रोजी दिनांक ३०/०७/२०२४ रोजी मा. न्यायालयाने जन्मठेप व ५,००० रू दंड व दंड न भरल्यास २ महिने अधिक सजा तसेच कलम ३०७ भादवि मध्ये ८ वर्षे व २०००/— अशी शिक्षा सुनावली आहे. |

तपास कौशल्य :— नमुद गुन्हयात दिनांक १२/०५/२०१८ रोजी ००.३० वा. चे सुमारास फिर्यादी व त्यांचा मित्र मोहम्मद राशिद मोहम्मद सईद अन्सारी रा.ठी. मदनपुरा, नागपाडा, मुंबई ०८ येथे भेटण्यासाठी गेले होते. दिनांक १२/०५/२०१८ रोजी साधारण ००.४५ वा चे सुमारास फिर्यादी व त्याचा मित्र मोहम्मद राशिद मोहम्मद सईद अन्सारी लोहे की चाळ नागपाडा येथे बोलत उभे असताना लोहे की चाळ, येथे राहणारा फाजील अन्सारी नावाचा इसम तेथे आला असता फिर्यादी व त्याचा मित्र राशिद अन्सारी यांचेकडे रागाने बघत होता. म्हणून फिर्यादी यांचा मित्र राशिद अन्सारी याने फाजील अन्सारी यास '' क्या देख रहे हो,'' असे विचारले असता, फाजील अन्सारी यास ''क्या देख रहे हो,'' असे विचारले असता फाजील अन्सारी याने '' **तुम इधर क्यू मॉ चूदाने आते हो, तुम्हारा क्या नाटक चल रहा है, मे तुम्हे देखने आया हू** '' असे म्हणत सदर ठिकाणाहून निघुन गेला.

त्यानंतर फिर्यादी व त्यांचा मित्र मो. रशीद मो. सईद अन्सारी उभे राहुन गप्पा करीत असताना फाजील अन्सारी अचानक त्यांच्या समोर आला व त्याने त्याच्या हातीतील चाकुने फिर्यादीच्या मित्र मो. राशीद मो. सईद अन्सारी यांचेवर वार केला म्हणुन फिर्यादी यांचे मित्र मो. राशिद मो. सईद अन्सारी यास वाचवण्यासाठी मध्ये पडले असता फाजीत अन्सारी याने चाकुने फिर्यादीवर चाकुचे वार केले व फाजील अन्सारी तेथुन पळुन गेला. फाजील अन्सारी याने केलेल्या चाकुच्या वाराने फिर्यादी व त्यांचा मित्र मो. राशीद मो. सईद अन्सारी हे गंभीर जखमी झाले घटनास्थळावर असलेल्या लोकांनी जखमी फिर्यादी व त्यांचा मित्र मो. राशीद मो. सईद अन्सारी यांना उपचाराकरीता नायर रूग्णालय येथे घेऊन गेले.

नायर रूग्णालय येथे उपचारा दरम्यान फिर्यादीचा मित्र मो. राशीद मो.सईद अन्सारी हा मयत झाला असुन फिर्यादींना त्यांचे नातेवाईक पुढील उपचाराकरीता व्होकार्ड रूग्णालय, आग्रीपाडा येथे दाखल केले व जखमी फिर्यादी यांचा प्रथम खबरी जबाब नोंदवुन गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयाचे तपासादरम्यान फिर्यादी यांचा सविस्तर जबाब नोंद करण्यात आला. गुन्हयातील मयत इसमाचे व जखमी फिर्यादी यांचे अंगावरील रक्ताने माखलेले कपडे पंचनाम्याअंतर्गत ताब्यात घेण्यात आले. तसेच घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला घटनास्थळावर हजर असलेल्या इन्व्हेस्टीगेशन व्हॅनवरील रासायनिक विश्लेषक श्रीमती सिमा देवदास गुप्ता यांनी घटनास्थळावरून रक्तमिश्रीत मातीचे नमूने रक्ताचा नमूना ताब्यात घेवून तो रासायनिक विश्लेषणाकरीता पाठविण्यात आला तसेच रासायनिक विश्लषक श्रीमती सिमा देवदास गुप्ता यांचा जबाब नोंद करून गुन्हयाचे कागदपत्रामध्ये समाविष्ठ करण्यात आला. गुन्हयातील प्रत्यक्ष साक्षीदार नामे १) फरहाद अन्सारी वय २६ वर्षे, २) झकेरीया अस्लम अन्सारी वय २७ वर्षे, ३) मोहम्मद असद अब्दूल हमिद अन्सारी, ४) अन्सारी झैब आलम निसार अहमद वय २९ वर्षे ५) शबीब नबी मोहम्मद खान वय २५ वर्षे यांचे जबाब नोंद करण्यात आले आहेत. तसेच वर नमूद प्रत्यक्ष साक्षीदार यांचे सीआरपीसी कलम १६४ प्रमाणे मा. न्यायालयासमक्ष जबाब नोंद करण्यात आले असून ते गुन्हयाचे मूळ कागदपत्रामध्ये समावि ठ करण्यात आले आहेत.

सदर गुन्हयात पाहीजे आरोपीचे मोबाईलचे सिडीआर एसडीआर प्राप्त करून ते गुन्हयाचे मूळ कागदपत्रामध्ये समावि ठ करण्यात आले आहेत. आरोपीचा पुर्व इतिहास तपासून त्याचेवर दाखल असलेल्या गुन्हयाची नोंद गुन्हयाचे मूळ कागदपत्रामध्ये घेण्यात आली आहे. नमूद गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या चिजवस्तू तसेच रक्ताचे नमूने, फिर्यादी व मयत इसमाचे कपडे रासायनिक विश्ले णाकरीता तात्काळ पाठवून त्याबाबतचे वैज्ञानिक प्रयोगशाळा, कलिना मुंबई येथे पाठवून अहवाल प्राप्त करण्यात आले आहेत.

गुन्हयाचे दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केल्यानंतर प्राप्त झालेले पुरावे सीआरपीसी कलम १७३(८) प्रमाणे मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या मूळ दो ारोप पत्रामध्ये समाविष्ठ करण्यात आले आहेत.

**नागपाडा पोलीस ठाणे, परिमंडळ—०३, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ. क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | श्री.महेशकुमार नवलसिंग ठाकूर | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक | श्री. प्रबोधन मारूती येजरे | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक | श्री.विदयासागर विठ्ठल कालकुंद्रे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री संदेश अरूण मांजरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | श्री प्रसाद अरूण राउत | |
| ६ | सहाय्यक पोलीस उप निरीक्षक क्र. २९१७० | संतोष कृष्णा परब | |
| ७ | पो.ह..क्र. ९६०३३० | विजय नामदेव कुसले | प्रशस्तीपत्रक |
| ८ | म.पो.शि. क्र ०९.१२९७ | दामीनी देविदास दाभाडे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.शि.क्र.०९.०६२१ | स्तोष विठठ्ल उमवणे | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.शि.क्र .१४.०३८३ | निशांत विलास पवार | |